NOTARY ★ VIGNI ★ GOVERNMENT OF
Adv. VIKAS DTTATRAYA KODRE
AREA MAH.
Regd. No. 15284/2019
Exp. Dt. 03/11/2024

**Government of Maharashtra**

School Education and sports Department
Mantralaya Extension building Room No. 432
Madam Cama Road, Hutatma Rajguru Chowk, Mumbai – 400032
Phone No. E – mail ID smr.sesd-mh@gov.in

**No. S F S - 1021 / C. No. 460 / SM – 2** **Dtd. 13 Apr. 2022**

**Letter of recognition**

To- The Chairman / secretary,
T. L. Tupe education society,
Sadesatara Nali, Ansari phata, Hadapsar, Pune – 411028.

Sub ; - About issuing permission to establish a new school and also to up - grade the existing school on the self financed basis for the educational year 2022 - 23, under Maharashtra Self – financed Schools (Establishment and Regulation) Act, 2012.

The Brilliant school , at Manjari Bk. , Haveli, Dist. Pune run by T. L. Tupe education society, Hadapsar, Pune.

Ref : - The expression of interest vide letter No. S F S - 1021 / C. No. 460 / SM – 2 Dtd. 06/09/2021.

An application of the Brilliant school , at Manjari Bk. , Haveli, Dist. Pune, for starting a school Primary to higher secondary ( Std. 1 st up to 12 th CBSE, English medium all branches) from the year 2022 – 23 on the basis of self -financed basis, was submitted.

[ 2 ] In reference of the above said application, a letter of the expression of interest was given to The Brilliant school, Manjari Bk. , Haveli, Dist. Pune run by T. L. Tupe education society, Hadapsar, Pune, for Primary to higher secondary ( Std. 1 st up to 12 th C. B. S. E. , English medium all branches) from the year 2022 – 23 on the basis of self financed basis, under the Maharashtra Self – financed Schools ( Establishment and Regulation ) Act, 2012. and the Maharashtra Self – financed Schools ( Establishment and Regulation ) rules, 2020 subject to the compliance of following terms and conditions

3 ] TERMS AND CONDITIONS

[ 1 ] The said proposed school should comply all existing standards, terms and conditions and rules / provisions which will be made from time to time under the Right of Children to Free and Compulsory Education Act, 2009 and the Right of Children to Free and Compulsory Education rules, 2011.

[ 2 ] It is compulsory for the registered institution, or trust to comply the Maharashtra Self – financed Schools ( Establishment and Regulation ) Act, 2012 and all existing standards, norms, terms and conditions and rules / provisions which will be made from time to time under it.

[ 3 ] It is compulsory for those managements which are interested in affiliation to the C. B. S. E. or I. C. S. E. or I. B. etc. boards, to obtain a No objection certificate from government, as per the directives of the government issued from time to time.

[ 4 ] The management of the school will inform the education officer of the concerned district regarding beginning the school, before beginning the school as per the sanctioned educational year by the government.

TRUE COPY

This Marathi into English Translation is done by ANIL SHRIPAD GORE, Member, Translation Panel, Govt. of Maharashtra appointed Vide GR.No. NAMIKA-2019/C. No 29/Bhasha–2 Dated 22 March 2021

प्रा. अनिल गोरे
Sign of the Translator
ANIL S. GORE
471, SHANIWAR PETH,
PUNE - 411 030.

09 DEC 2023

Adv. VIKAS D. KODRE
NOTARY GOVT. OF INDIA
S.No. 31/4, Shri Swami Samarth Kunj
K. tarte Baug, Mundhwa, Pune-36.

[ 5 ] The permission issued as per the provision under this act is applicable to only that year, from which the new school is permitted to be started or that year, from which the permission is given fo up – grade the school.

[ 6 ] If the management of the school fails to begin the school within 18 months, the letter of recognition will be cancelled.

[ 7 ] The sanctioned medium, school location etc. cannot be changed in future by the management without the permission of the government.

[ 8 ] If the school management establish the school at the location other than the location for which government has given permission then permission given will stand cancelled.

[ 9 ] A provision is made that, the recruitment of teachers and non – teaching staff in the self – financed schools, should be made according to the prevalent rules and regulations of the government.

[ 10 ] While filling the district – wise information, the schools which are given permission, will fill up the information about that school in the separate category as " self – financed school " and will obtain U – DISE No. The project director, Maharashtra Primary education council, Mumbai, is declared as the nodal officer in this regard.

[ 11 ] The management of the school will display a board at the entrance gate of the school campus as " self – financed school ".

[ 12 ] The state government can cancel this letter of recognition any time on the reason of breach of any rule, provision made under this act or breach of any rule, provision in this act or breach of any directive given under this act or breach of any of the standards designated by the government from time to time or failing of complying with any of the terms and conditions stated in this act.

[ 13 ] It will be necessary that, the above said institution or trust or company should should deposit an amount designated in the " Schedule G " of this act on the joint name of the management and the concerned education officer (Secondary) in the form of the national savings certificate or in the form of the term deposit in any nationalised bank.

Sd / -
( I. M. Kazi )
Joint Secretary, Govenment of Maharashtra

NOTARY Adv. VIKAS DTTATRAYA KODRE AREA MAH. Regd. No. 15284 / 2019 Exp. Dt. 03 / 11 / 2024 GOVERNMENT OF INDIA

Copy presented for necessary action to –

[ 1 ] Commissioner ( Education ) Maharashtra State. Pune.
[ 2 ] State project director, Maharashtra Primary Education council, Mumbai.
[ 3] Director of Education ( Secondary and Higher Secondary), Maharashtra State, Pune-
[ 4 ] Director of Education ( Primary), Maharashtra State, Pune
[ 5 ] Regional Dy. Director, Education, Pune.
[ 6 ] Education Officer, ( Primary / Secondary) Zilla Parishad, Pune.
[ 7 ] Selective file – S M – 2 (460 / 2022)

TRUE COPY

Adv. VIKAS D. KODRE
NOTARY GOVT. OF INDIA
S.No. 51/4, Shri Swami Samarth Kunj
Kirtane Baug, Mundhwa, Pune-36.

This Marathi into English Translation is done by ANIL SHRIPAD GORE, Member, Translation Panel, Govt. of Maharashtra appointed Vide GR.No. NAMIKA-2019/C. No 29/Bhasha–2 Dated 22 March 2021

0 9 DEC 2023

प्रा. अनिल गोरे
Sign of the Translator

ANIL S. GORE
471, SHANIWAR PETH,
PUNE - 411 030.

**महाराष्ट्र शासन**

शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,

मंत्रालय (विस्तार), दालन क्र.४३२,

मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरु चौक, मुंबई-३२.

दूरध्वनी क्र:- Email ID:- sm२.sesd-mh@gov.in


क्रमांक:-एसएफएस-१०२१/प्र.क्र.४६०/एसएम-२ दिनांक:- १३ एप्रिल, २०२२

# मान्यता पत्र

प्रति,

**अध्यक्ष / सचिव,**

**टि. एल. तुपे एज्युकेशन सोसायटी,**

**साडेसतरा नळी, अनसारी फाटा, हडपसर, पुणे-४११०२८.**

**विषय-** महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वयं अर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा सुरू करण्यासाठी किंवा विद्यमान शाळांचा दर्जावाढ करण्यासाठी मान्यता पत्र...

**टि. एल. तुपे एज्युकेशन सोसायटी, हडपसर, पुणे संचलित द ब्रिलियंट स्कूल, मांजरी बुद्रुक, ता.हवेली, जि.पुणे.**

**संदर्भ-** इरादा पत्र क्रमांक एसएफएस-१०२१/प्र.क्र.४६०/एसएम-२, दिनांक ०६/०९/२०२१.

महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत **टि. एल. तुपे एज्युकेशन सोसायटी, हडपसर, पुणे** या संस्थेने शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून **द ब्रिलियंट स्कूल, मांजरी बुद्रुक, ता.हवेली, जि.पुणे (प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ.१ ली ते १२ वी, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई., सर्व शाखा)** ही स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर नवीन शाळा सुरु करण्याकरिता अर्ज सादर केला होता.

२. आपल्या अर्जाच्या संदर्भात, महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ आणि महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम, २०२० अंतर्गत शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून **टि. एल. तुपे एज्युकेशन सोसायटी, हडपसर, पुणे संचलित द ब्रिलियंट स्कूल, मांजरी बुद्रुक, ता.हवेली, जि.पुणे (प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ.१ ली ते १२ वी, इंग्रजी माध्यम, सी.बी.एस.ई., सर्व शाखा)** स्वयंअर्थसहाय्यित तत्त्वावर शाळेचे बांधकाम सुरु करण्याकरिता, अटीं व शर्तीसह इरादा पत्र दिले होते. आता सदर शाळा सुरु करण्याची मान्यता, पुढील अटीं व शर्तीस अधीन राहून देण्यात येत आहे :-

३. अटी व शर्ती :-

१) प्रस्तावित शाळा, बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क अधिनियम, २००९ आणि महाराष्ट्र बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा हक्क नियम, २०११ यांद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांची, अटींची व शर्तीची आणि या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांची किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांची किंवा प्रमाणकांची किंवा अटींची आणि शर्तीची पूर्तता करील.

२) नोंदणीकृत संस्थेने किंवा न्यासाने किंवा कंपनीने, महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ याद्वारे निर्धारित केलेल्या सर्व मानकांचे, अटींचे व शर्तीचे आणि

या अधिनियमान्वये शासनाने दिलेल्या निदेशांचे किंवा शासनाने, वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा अटींचे आणि शर्तींचे पालन करणे अनिवार्य आहे.

३) सी.बी.एस.ई. किंवा सी.आय.एस.सी.ई. किंवा सी.ए.आय.ई. किंवा आय.बी. इत्यादी मंडळाच्या संलग्नतेसाठी इच्छुक शाळा व्यवस्थापनांनी, शासनाने वेळोवेळी दिलेल्या निदेशांनुसार, शासनाकडून ना-हरकत प्रमाणपत्र घेणे अनिवार्य आहे.

४) शाळा व्यवस्थापन, शासनाने मंजूर केलेल्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात करण्यापूर्वी संबंधित जिल्ह्याच्या शिक्षण अधिकाऱ्यास कळवील.

५) या अधिनियमाच्या तरतुदींअन्वये नवीन शाळेची स्थापना करण्यासाठी किंवा शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी दिलेली परवानगी, ती ज्या शैक्षणिक वर्षासाठी मंजूर केली आहे, त्याच वर्षासाठी असेल.

६) जर शाळा व्यवस्थापन, १८ महिन्यांच्या आत, शाळा सुरु करण्यास अपयशी ठरल्यास, दिलेले मान्यता पत्र रद्द होईल.

७) शाळा व्यवस्थापनास, मंजूर केलेले शिक्षणाचे माध्यम, शाळेचे ठिकाण, भविष्यात, शासनाच्या परवानगीशिवाय बदलता येणार नाही.

८) जर शाळा व्यवस्थापनाने, शासनाने मंजुरी दिलेल्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणी शाळा स्थापन केली असेल तर, त्या शाळेची परवानगी रद्द होईल.

९) अशी तरतूद करण्यात आली आहे की, स्वयं अर्थसहाय्यित शाळेतील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची भरती शासनाच्या प्रचलित नियमांनुसार व विनियमांनुसार करण्यात यावी.

१०) जिल्हानिहाय माहिती भरतेवेळी, ज्या शाळेस परवानगी देण्यात आली आहे, ती शाळा, स्वतंत्र प्रवर्ग म्हणून "स्वयंअर्थसहाय्यित शाळा" अशी माहिती भरतील व यु.डी.आय.एस.इ. क्रमांक मिळवितील. यासंबंधात, राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांस, नोडल अधिकारी म्हणून घोषित करण्यात आले आहे.

११) शाळा व्यवस्थापन, शाळा परिसराच्या प्रवेशद्वारावर "स्वयंअर्थसहायित परवानगीप्राप्त शाळा" असा फलक लावतील.

१२) या अधिनियमाच्या कोणत्याही किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींचा भंग केल्याच्या किंवा अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही निदेशांचे किंवा शासनाने वेळोवेळी निर्दिष्ट केलेल्या मानकांचे किंवा प्रमाणकांचे अथवा अटी व शर्तींचे अनुपालन करण्यात कसूर केल्याच्या कारणावरुन, कोणत्याही वेळी, राज्य शासन, दिलेले मान्यता पत्र रद्द करु शकेल.

१३) सदर संस्थेने किंवा न्यासाने किंवा कंपनीने अधिनियमाच्या "अनुसूची ग" मध्ये विनिर्दिष्ट केलेली रक्कम व्यवस्थापन आणि संबंधित शिक्षणाधिकारी (माध्यमिक) यांच्या नावे संयुक्तरित्या, राष्ट्रीय बचत प्रमाणपत्राच्या स्वरुपात किंवा कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेतील मुदत ठेवीच्या स्वरुपात ठेवणे आवश्यक राहील.

(इ.मु. काझी)
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी :-

१. आयुक्त, शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
३. संचालक, (माध्यमिक व उच्च माध्यमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. संचालक, (प्राथमिक), महाराष्ट्र राज्य, पुणे.
५. विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे.
६. शिक्षणाधिकारी (प्राथमिक/माध्यमिक), जिल्हा परिषद, पुणे.
७. निवड नस्ती-एसएम-२ (४६०/२०२१).

## The office of the deputy director of education , Pune region.

17, Dr. Ambedkar Marg, Opp. Red temple, Pune – 411001.
Phone No. 020 – 26125616 / 26122217  E – mail I D dydepune@gmail.com
Website www.dypune.com

O. No. Shi. U. S / Prath. 204 / Manyata / Pu. Vi 2022 / 5175 / Dtd. 09/05/2022

To –

Chairman / Secretary,
T. L. Tupe Education Society, Sadesatara Nali, Ansari phata, Hadapsar Pune – 411028.

Sub : - Regarding action to be carried out according to the government recognition letter for starting a new school from the year 2022 – 23, on the self – finance basis.

Ref - [ 1 ] The letter of recognition vide outward No. S F S - 1021 / C. No. 460 / SM – 2 Dtd. 13 Apr. 2022 from the Hon. I. M. Kazi, joint secretary, school education and sports department, Mantralaya extension building, Mumbai – 400032.
[ 2 ] the letter of Chairman,T. L. Tupe Education Society, Sadesatara Nali, Ansari phata, Hadapsar, Pune – 411028 with no mention of date on it.

A recognition was given to The Brilliant school , at Manjari Bk. , Haveli, Dist. Pune run by T. L. Tupe education society, Hadapsar, Pune, for opening a new school with Primary to higher secondary ( Std. 1 st up to 12 th C. B. S. E. , English medium all branches) from the year 2022 – 23 on the basis of self finance, under the Maharashtra Self – financed Schools ( Establishment and Regulation ) Act, 2012.

The terms and conditions mentioned in the order of recognition as per the ref. No. 1, vide the points Nos. 1 up to 13 are binding upon the institution / school , and the further action should be carried out as per the provisions in the Maharashtra Self – financed Schools ( Establishment and Regulation ) Act, 2012. ( act 01 of 2013 ) and the Maharashtra Self – financed Schools ( Establishment and Regulation ) rules, 2020.

Sd / -
( Audumbar Ukirde )
Dy. Director of education
Pune Region, Pune

Copy presented humbly for information to –

[ 1 ] Commissioner ( Education ) Maharashtra State. Pune and Chairman, state level authority. .
[ 2 ] Director of Education ( Secondary and Higher Secondary), Maharashtra State, Pune-
[ 3] Desk officer, School Education and sports Department Mantralaya, Mumbai – 32.
[ 4 ] Education Officer, (Secondary) Zilla Parishad, Pune.

TRUE COPY

Adv. VIKAS D. KODRE
NOTARY GOVT. OF INDIA
S. No. 51/4, Shri Swami Samarth Kunj, Kirtane Baug, Mundhwa, Pune - 36.

NOTARY
Adv. VIKAS DTTATRAYA KODRE
AREA MAH
Exp. Dt. 03 / 11 / 2024
GOVERNMENT OF INDIA

09 DEC 2023

This Marathi into English Translation is done by ANIL SHRIPAD GORE, Member, Translation Panel, Govt. of Maharashtra appointed Vide GR No. NAMIKA-2019/C. No 29/Bhasha-2 Dated 22 March 2021

अ.श्री.गोरे
Sign of the Translator
ANIL S. GORE
471, SHANIWAR PETH,
PUNE - 411 030.

**शिक्षण उपसंचालक कार्यालय, पुणे विभाग,**
१७,डॉ.आंबेडकर मार्ग,लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.
दुरध्वनी क्र.-०२०-२६१२५६९६/२६१२२२१७ ई मेल आय डी क्र. dydpune@gmail.com
वेब साईट- WWW.dydepune .com

---

जा.क्र. शिउसं/प्राथ-२०४/मान्यता/पुवि/२०२२/ ५९७५ दिनांक : 09 MAY 2022

प्रति,
अध्यक्ष/सचिव, टि.एल.तुपे एज्युकेशन सोसायटी,साडेसतरा नळी,अनसारी फाटा,हडपसर पुणे-४११०२८.

विषय : २०२२-२३ पासून स्वयंअर्थसहाय्यीत तत्वावर नवीन शाळा सुरु करण्यासाठी मिळालेल्या शासन मान्यतेचे अनुषंगाने करावयाचे कार्यवाहीबाबत

संदर्भ : १.मा.इ.मु काझी, सहसचिव, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग,मंत्रालय,विस्तार भवन,मुंबई-३२ यांचेकडील मान्यता पत्र जा.क्र.एसएफएस-१०२१/प्र.क्र ४६०/एसएम-२, दिनांक १३.४.२०२२
२. अध्यक्ष , टि.एल.तुपे एज्युकेशन सोसायटी,साडेसतरा नळी,अनसारी फाटा,हडपसर पुणे-४११०२८. यांचे दिनांक नमूद नसलेले पत्र

महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ अंतर्गत टि.एल.तुपे एज्युकेशन सोसायटी, हडपसर पुणे संचलित द ब्रिलियंट स्कूल,मांजरी बुद्रुक,ता.हवेली जि. पुणे या प्राथमिक ते उच्च माध्यमिक, इ. १ ली ते इ. १२ वी, सर्व शाखा इंग्रजी माध्यम सी बी एस ई. यानुसार संदर्भीय क्र. १ चे शासन आदेशान्वये शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून नवीन शाळेस मान्यता देण्यांत आलेली होती.

सदर संदर्भ क्र. १ चे मान्यता आदेशातील अ.क्र. १ ते १३ मुददयाव्दारे नमूद केलेल्या अटी व शर्ती आपल्या संस्थेस/शाळेस बंधनकारक असून त्यानुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ आणि महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) नियम २०२० मधील तरतुदीनुसार करण्यांत यावी.

(औदुंबर उकिरडे)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग पुणे-१

प्रत : माहितीस्तव सविनय सादर
१. मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे तथा अध्यक्ष, राज्यस्तरीय प्राधिकरण
२. मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य पुणे
३. कक्ष अधिकारी, शालेय शिक्षण व क्रीडा विभाग मंत्रालय,मुंबई,मुंबई-३२.
४. शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जिल्हा परिषद, पुणे

NOTARY
Adv. VIKAS DATTATRAYA KODRE
AREA MAH.
Regd. No. 15284/2019
Exp. Dt. 03/11/2024
GOVERNMENT OF INDIA

**Pune Zilla Parishad, Pune**
Yashwantrao Chavan Bhavan, Wellesly Road, Camp, Pune – 411001.
Education Department (Primary)
E – mail : edupri.zppune@gmail.com ssapune1@yahoo.co.in

Out. No. Z. P. Shikshan / prath / Kha Pra Sha – 4 / Swayam. A. Shala / 483 / 50 / 2022. Date : - 20/10/2022.

To : -
Chairman / Secretary / Head - Master,
The Brilliant school , at Manjari Bk. , Haveli, Dist. Pune.

Subject : – To issue permission for sanction to establish new school and also to up - grade the existing school since the educational year 2022 - 23, under Maharashtra Self - financed Schools ( Establishment and Regulation ) Act, 2012.

Reference : –
( 1 ) Government Resolution S F S – 1021 / C. No. 460 / S M - 2 Dated 13 Apr. 2022.
2 ) O. No. Shi. U. S / Prath. 204 / Manyata / Pu. Vi 2022 / 5175 / Dtd. 09/05/2022 / of Office of the Dy. Director, Education, Pune region Pune
3 ) The inspection report of Smt. Nilima Mhetre, extension officer (education), Z. P. Pune Dtd. 25/08/2022.

Regarding the above subject you are informed that, your institute had submitted an proposal to establish a new school / to up - grade the existing school as per that proposal, according to G. R. in Reference No. 2, your institute is being given the first recognition to establish a primary up to higher primary school from Std. 1 st up to Std. 8 th. on the terms and conditions as follows.

| Govt List No. | Name of the applicant Institute | Name and address of recognised school | Medium | Category of schoolNew school / Up - gradation | recognised class / Division | year of recognition |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 |
| 1 | T. L.Tupe education society, Hadapsar, Pune. | The Brilliant school , at Manjari Bk. , Haveli, Dist. Pune. | English | New school ( C. B. S. E. ) Self – financed school | Primary to ( Std 1st to Std 8 th ) | 2022 - 23 |

TRUE COPY
Adv. VIKAS D. KODRE
NOTARY GOVT. OF INDIA
S.No. 51/4, Shri Swami Samarth Kunj
Kirtane Baug, Mundhwa, Pune-36.
0 9 DEC 2023

This Marathi into English Translation is done by ANIL SHRIPAD GORE, Member, Translation Panel, Govt. of Maharashtra appointed Vide GR No. NAMIKA-2019/C. No 29/Bhasha–2 Dated 22 March 2021

Sign of the Translator
ANIL S. GORE
471, SHANIWAR PETH,
PUNE - 411 030.

## Terms and conditions : -

1 ] The medium, school location etc. prescribed by institute for permission of school cannot be changed in future.

2 ] If the school is established at the location other than the location for which government has given permission then permission given by government will stand cancelled automatically.

3 ] According to provisions of this act the permission has been granted to establish the classes.

4 ] By reference No. 02 the permission is granted for starting the new school in year 2022 - 23. If the school is not started within 18 (Eighteen) months since receiving this permission, this permission will stand cancelled automatically.

5 ] It will be compulsory for the new schools which are granted permission to follow Government orders issued time to time, procedures and also all provisions of the Right of Children to Free and Compulsory Education Act, 2009 and Maharashtra Self-financed Schools ( Establishment and Regulation ) Act, 2012.

6 ] Displaying a publicly visible board on the school building as New school / Class granted permission on Self-financed basis ( Establishment and Regulation ) is compulsory.

7 ] The school is granted permission under the act of Maharashtra Self - financed Schools ( Establishment and Regulation ) Act, 2012 will not be migrated to any other place in future.

8 ] this recognition is is being given subjected to the compliance of the point No 2 among the terms and conditions in the Government Resolution S F S – 1021 / C. No. 460 / S M - 2 Dated 13 Apr. 2022.

9 ] It will be necessary for the schools granted permission under Maharashtra Self - financed Schools (Establishment and Regulation) Act, 2012 to make a separate entry as self - financed school / class while filling up information in U - DISE.

Implementation of the existing rules of government in practice and the rules prescribed by government from time to time will be binding on the institute.

Sd / -
Education officer (Primary)
Pune Zilla Parishad, Pune

Copy presented humbly for information –

1 ] Hon. Under secretary, school education and sports department, Mantralaya Mumbai-32

2 ] Hon. Director of Education ( Secondary and Higher Secondary), Directorate of Education, Maharashtra State, Pune-1

3 ] Hon. Director of Education (Primary), Directorate of Education, Maharashtra State, Pune-1

NOTARY
Adv. VIKAS DTTATRAYA KODRE
AREA MAH.
Regd. No. 15284 / 2019
Exp. Dt. 03 / 11 / 2024
GOVERNMENT OF INDIA

TRUE COPY

Adv. VIKAS D. KODRE
NOTARY GOVT. OF INDIA
S. No. 51/4, Shri Swami Samarth Kunj
Kirtane Baug, Mundhwa, Pune-36.

0 9 DEC 2023

This Marathi into English Translation is done by ANIL SHRIPAD GORE, Member, Translation Panel, Govt. of Maharashtra appointed Vide GR.No. NAMIKA-2019/C. No 29/Bhasha–2 Dated 22 March 2021

प्रा. अनिल गोरे
Sign of the Translator
ANIL S. GORE
471, SHANIWAR PETH,
PUNE - 411 030.

# पुणे जिल्हा परिषद, पुणे.
## यशवंतराव चव्हाण भवन, वेलस्ली रोड, कॅम्प, पुणे - ४११ ००१.
## शिक्षण विभाग (प्राथमिक)
Email- edupri.zppune@gmail.com | ssapune1@yahoo.co.in


जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ/खाप्राशा 4/स्वयंअशाळा/483/५०८५/ 2022 दिनांक:-२०/ १० /2022

प्रति,

अध्यक्ष/सचिव/मुख्याध्यापक,
द ब्रिलियंट स्कुल, मांजरी बुद्रक,
ता.हवेली,जि.पुणे

**विषय:-** सन 2022-23 या शैक्षणिक वर्षापासुन महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा(स्थापना व विनियमन)अधिनियम 2012 अंतर्गत स्वयंअर्थसहाय्यित तत्वावर नवीन शाळा स्थापना करणे,तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी परवानगी देण्याबाबत..

*संदर्भ :-* 1.शासन निर्णय क्र. एसएफएस-1021/प्र.क्र.460/एसएम-2 दि- 13 एप्रिल 2022
2. शिक्षण उपसंचालक पुणे क्र. शिउसं/प्राथ -204/ मान्यता/पुवि 2022/5175/ दिनांक - 09/05/2022
3. श्रीम. निलिमा म्हेत्रे, विस्तार अधिकारी (शिक्षण), जि.प.पुणे यांचा दिनांक 25/08/2022 तपासणी अहवाल

वरील विषयी आपणास कळविण्यात येते की, आपल्या संस्थेने नविन शाळा करण्याकरिता प्रस्ताव सादर केला होता. त्या प्रस्तावानुसार आपल्या संस्थेस संदर्भ क्र .2 च्या निर्णयानुसार **खालील अटी व शर्तींवर विद्यमान** प्राथमिक **इयत्ता 1 ली ते इयत्ता 8 वी साठी प्रथम मान्यता देण्यात येत आहे.**

| अ.क्र. | संस्थेचे नाव व पुर्ण पत्ता | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पुर्ण पत्ता | माध्यम | शाळेचा प्रकार नवीन शाळा/ दर्जावाढ | मान्यता वर्ग / इयत्ता | मान्यता वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | टि.एल.तुपे एज्युकेशन सोसायटी हडपसर, पुणे | द ब्रिलियंट स्कुल, मांजरी बुद्रक, ता. हवेली, जि.पुणे | इंग्रजी | नवीन शाळा(सी.बी.एस.ई) (स्वयंअर्थसहाय्यित शाळा) | प्राथमिक इयत्ता 1 ली ते इयत्ता 8 वी | २०२२-२३ |

**<u>अटी व शर्ती</u>**

1. संस्थेने वर्ग परवानगीसाठी विहीत केलेले माध्यम, शाळेचे ठिकाण इ.मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.
2. शासनाने ज्या ठिकाणासाठी नविन शाळा परवानगी दिलेली आहे, त्या ठिकाणा व्यतिरिक्त अन्य ठिकाणी वर्ग सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्द समजण्यात येईल.
3. याअधिनियमातील तरतुदीनूसार वर्ग करण्यास परवानगी दिलेली आहे.
4. संदर्भ क्रमांक 02अन्वये सन २०२२-२३ मध्ये नविन शाळा परवानगी देण्यात येत आहे.परवानगी मिळाल्यापासून अठरा महिन्याच्या आत वर्ग सुरु न केल्यास सदर परवानगी रद्दबातल ठरेल.
5. परवानगी देण्यात आलेल्या वर्ग शासनाच्या वेळोवेळी निर्गमित होणाऱ्या आदेशाचे, कार्यपध्दतीचे तसेच बालकांचा मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकारअधिनियम 2009 व महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यितशाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 मधील सर्व तरतूदींचे पालन करणे बंधनकारक राहिल.
6. शाळा इमारतीच्या दर्शनी भागात सर्व जनतेच्या माहिती करिता स्वयंअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त वर्गअसे दर्शविणारा फलक लावणे बंधन कारक राहील.
7. महाराष्ट्र स्वयं अर्थसहाय्यितशाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम 2012 या अधिनियमाच्या अंतर्गत मान्यता दिलेल्या शाळांना भविष्यात अन्य ठिकाणी स्थलांतर करता येणार नाही.
8. शासन निर्णय क्र. एसएफएस-1021/प्र.क्र.460/एसएम-2 दि- 13 एप्रिल 2022 तील अटी शर्तीतील मुददा क्र. 2 चे पुर्ततेच्या अधिन राहुन मान्यता देणेत येत आहे.
9. महाराष्ट्र स्वयंअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन)अधिनियम 2012 याअधिनियमाच्या अंतर्गत परवानगी दिलेल्या शाळांना UDISE मध्ये माहिती भरताना स्वयंअर्थसहाय्यित वर्ग म्हणून स्वतंत्र नोंद करणे आवश्यक राहील.
10. शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमाची अंमलबजावणी करणे बंधनकारक राहील.

शिक्षणाधिकारी(प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद,पुणे

**प्रत - माहितीसाठी सविनय सादर-**
1)मा.अवरसचिव,शालेय शिक्षण व क्रीडाविभाग,मंत्रालय,मुंबई-32.
2)मा.शिक्षण संचालक(माध्य.वउच्च माध्य.),शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,पुणे-1
3)मा.शिक्षण संचालक(प्राथमिक),शिक्षण संचालनालय,महाराष्ट्रराज्य,पुणे-1.

NOTARY ★ Adv. VIKAS DTTATRAYA KODRE AREA MAH. Regd. No. 15284/2019 Exp. Dt. 03/11/2024 GOVERNMENT OF INDIA

# Pune Zilla Parishad, Pune

Yashwantrao Chavan Bhavan, Wellesly Road, Camp, Pune – 411001.
Education Department ( Primary )
E – mail : edupri.zppune@gmail.com ssapune1@yahoo.co.in

## Self – Recognition certificate Form 2

Out. No. Z. P. Shikshan / prath . / Kha Pra Sha – 1 / 2642 / 6699 / 2022 Pune 1. Date : - 23/12/2022

To : -
Chairman / Secretary / Head - Master,
The Brilliant school, Manjari Bk. , Haveli conducted by T. L. Tupe Education Society, Hadapsar Pune.

Subject : - About Issuing Recognition Certificate for the School under sub - rule (4) of rule 11 of Right of Children to Free and Compulsory Education Rules, 2009 for the purpose of Section 18 of Right of Children to Free and Compulsory Education Act, 2011.

Ref : - The R. T. E. criterion inspection report given by Shri. Mahendrakumar More, cluster head Ashtapur, countersigned by Shri. Rajesaheb Londhe block education officer, Panchayat samiti, Dist. Pune Pune Dtd. 02/12/2022.

In reference to your application Dtd. 02/12/2018 and later correspondence made with the school regarding this and on the basis of school inspection, I, the education officer (Primary), Pune Z. P. Pune am giving temporary recognition for period from Date 1 April. 2022 up to the Date 31 March 2025 for classes of std. 1 st up to Std. 8 th to the Brilliant school, Manjari Bk. Tal, Haveli, Dist. Pune U – DISE No. 27250509230 run by the T. L. Tupe education society, Hadapsar, Pune. ( as a self – financed English Medium school conducted by T. L. Tupe Education Society, Hadapsar, Pune.

The above said recognition is subject to the compliance of the following terms.

[ 1 ] The period of recognition will not be extended and does not in any way imply any obligation to recognize / affiliate beyond Class 8 th.

[ 2 ] School will follow the Right of Children to Free and Compulsory Education Act 2009 ( Annexure I ) and Maharashtra Right of Children to Free and Compulsory Education Act 2011 ( Annexure II ).

[ 3 ] Schools should reserve 25 % of the seats in Class 1st for children from weaker section and disadvantaged group in the neighbourhood and should provide free and compulsory education till the completion of primary education. Provided, further that in case of pre - primary classes also, this norm shall be followed.

[ 4 ] For the children designated in para 3, school will get reimbursement as per article 12 ( 2 ) of the act. School will be given a separate bank account for such a reimbursement.

[ 5 ] The Institute / School shall not collect any capitation fee and will not subject the child or his or her Mother / Father or guardians to any screening procedure.

[ 6 ] Any child will not be denied an admission in the school for any reasons like lack of age proof, religion, cast, race or birth-location.

TRUE COPY

This Marathi into English Translation is done by ANIL SHRIPAD GORE, Member, Translation Panel, Govt. of Maharashtra appointed Vide GR.No. NAMIKA-2019/C. No 29/Bhasha–2 Dated 22 March 2021

प्रा. अनिल गोरे
Sign of the Translator
ANIL S. GORE
471, SHANIWAR PETH,
PUNE - 411 030.

Adv. VIKAS D. KODRE
NOTARY GOVT. OF INDIA
S.No. 51/4, Shri Swami Samarth Kunj
Kirtane Baug, Mundhwa, Pune-36.
09 DEC 2023

[ 7 ] ( One ) No child admitted shall be held back in the class where he is or expelled from school till the completion of primary education in the school.

( Two ) No child will be punished physically or harassed mentally.

( Three ) No child is required to pass any board examination till the completion of primary education.

( Four ) A child completing primary education shall be awarded a certificate as laid down under Rule 23

( Five ) Inclusion of Students with disabilities / special needs will be as per the provision of the Act.

( Six ) The teachers are recruited with minimum qualifications as laid under section 23 ( 1 ) of the Act. Provided further that, at the commencement of this Act the teachers who do not have minimum qualifications shall acquire such minimum qualifications within a period of 5 years from the date of initiation of this act.

( Seven ) The teachers will fulfil his / her duties as designated in the sec 24 ( 1 ) of the act, AND

( Eight ) The school will ensure that male teacher / female teacher should not get involved in the work of private tuitions.

[ 8 ] The School shall follow the syllabus on the basis of curriculum laid down by appropriate authority.

[ 9 ] The School shall enrol students proportionate to the facilities available in the school as prescribed in the section 19 of the Act.

[ 10 ] The School shall maintain the standards and norms as specified in section 19 of the Act.

The facilities reported at the time of last inspection are as given under:-

- Area of school campus : - 4000 Sq. m. Sq. Ft.
- Total built up area : - 1400 Sq. m. Sq. Ft.
- Area of play ground : - 2600 Sq. m. Sq. Ft.
- No. of class rooms : - 17 Class rooms

  Rooms for Headmaster – cum – Office – cum – Storeroom : - 4 Class rooms
- Are there separate toilets for boys and girls where sufficient water is available to keep them clean and are healthy for use ?

| | Boys | Girls |
|---|---|---|
| Toilets | 4 | 4 |
| Urinals | 26 | 12 |

- Drinking Water Facility : - yes
- Kitchen for cooking Mid Day Meal : - Not applicable

Availability of Teaching Learning Material / Playing Sports Equipment / Library : - yes

- Easy availability of reading material : - yes ( Library No. of books - 2400, , Periodicals / Newspaper : 3 )

TRUE COPY

This Marathi into English Translation is done by ANIL SHRIPAD GORE, Member, Translation Panel, Govt. of Maharashtra appointed Vide GR.No. NAMIKA-2019/C.No 29/Bhasha-2 Dated 22 March 2021

Sign of the Translator

ANIL S. GORE
471, SHANIWAR PETH,
PUNE - 411 030.

ADV. VIKAS D. KODRE
NOTARY GOVT. OF INDIA
S.No. 51/4, Shri Swami Samarth Kunj
Kirtane Baug, Mundhwa, Pune-36.

09 DEC 2023

NOTARY
Adv. VIKAS DTTATRAYA KODRE
AREA MAH.
Regd. No. 15284 / 2019
Exp. Dt. 03 / 11 / 2024
GOVERNMENT OF INDIA

[ 11 ] No unrecognized classes or divisions can be conducted within the premises of the school or outside in the same name of school.
[ 12 ] The school buildings or other structures or the grounds are used only for the purposes of education and skill development.
[ 13 ] The School is run by a society registered under the Societies Registration Act, 1860 ( 21 of 1860 ) or a public trust registered under Mumbai Public Trust Act, 1950.
[ 14 ] The School is not run for profit to any individual, group or association of individuals or any other persons.
[ 15 ] The accounts should be audited and certified by a Chartered Accountant and proper account statements should be prepared as per rules. A copy each of the Statements of Accounts should be sent to the District Education Officer every year.
[ 16 ] The recognition Code Number allotted to your school is S F S 1021 C. No. 460 / S. M. – 2 Dtd. 13/04/2022. This may please be noted and quoted for any correspondence with this office.
[ 17 ] The school should furnish such reports and information as may be required by the hon. Director of Education / District Education Officer from time to time and should comply with such instructions of the Government / Local Authority as may be issued to secure the continued fulfilment of the condition of recognition or the removal of deficiencies in working of the school.
[ 18 ] Renewal of Registration of Society if any, be ensured.
[19 ] Other conditions as per Annexure ' III ' enclosed.

Sd / -
(Sandhya Gaikwad)
Education Officer (Primary)
Pune Zilla Parishad, Pune

TRUE COPY
Adv. VIKAS D. KODRE
NOTARY GOVT. OF INDIA
S. No. 51/4, Shri Swami Samarth Kunj,
Kirtane Baug, Mundhwa, Pune - 36.

NOTARY
Adv. VIKAS DTTATRAYA KODRE
AREA MAH.
Regd. No. 15284 / 2019
Exp. Dt. 03 / 11 / 2024
GOVERNMENT OF INDIA

This Marathi into English Translation is done by ANIL SHRIPAD GORE, Member, Translation Panel, Govt. of Maharashtra appointed Vide GR.No. NAMIKA-2019/C. No 29/Bhasha–2 Dated 22 March 2021

Sign of the Translator
ANIL S. GORE
471, SHANIWAR PETH,
PUNE - 411 030.

पुणे जिल्हा परिषद, पुणे.
यशवंतराव चव्हाण भवन, वेलस्ली रोड, कॅम्प, पुणे – ४११ ००१.
शिक्षण विभाग (प्राथमिक)
Email- edupri.zppune@gmail.com | ssapune1@yahoo.co.in

## स्व-मान्यता प्रमाणपत्र नमुना २

जा.क्र.जि.प.शिक्षण/प्राथ./खा.प्रा.शा.-1/2022/8699/2022, पुणे-1 दिनांक -23/12/2022

प्रति,

अध्यक्ष/ सचिव/मुख्याध्यापक,
टि.एल.तुपे एज्युकेशन सोसायटी, हडपसर, पुणे संचलित द ब्रिलियंट स्कुल, मांजरी बुद्रक, ता. हवेली, जि.पुणे

विषय :- बालकांच्या मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क अधिनियम,2009 यांच्या कलम 18 च्या प्रयोजनार्थ, बालकांना मोफत व सक्तीचा शिक्षणाचा हक्क नियम,2011 याचा नियम 11, पोट नियम (4) अन्वयक शाळांना मान्यता प्रमाणपत्र देणेबाबत.

संदर्भ :- श्री. महेंद्रकुमार मोरे, केंद्रप्रमुख अष्टापुर, प्रतीस्वाक्षरी श्री राजेसाहेब लोंढे, गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती हवेली जि.पुणे यांचा आर.टी.ई.निकष तपासणी अहवाल दिनांक 02/12/2022

आपल्या दिनांक 02/12/2022 च्या अर्जाच्या संदर्भात आणि त्यानंतर या संदर्भात शाळेशी केलेला पत्रव्यवहार शाळेची केलेली तपासणी याआधारे. मी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), पुणे जिल्हा परिषद, पुणे दिनांक 1 एप्रिल 2022 पासून दिनांक 31 मार्च 2025 पर्यंत तीन वर्षाच्या कालावधीसाठी इयत्ता 1 ली ते इयत्ता 8 वी करिता टि.एल.तुपे एज्युकेशन सोसायटी, हडपसर, पुणे द ब्रिलियंट स्कुल, मांजरी बुद्रक, ता. हवेली, जि.पुणे UDISE क्रमांक 27250509230 ( स्वयं अर्थसहाय्यित इंग्रजी माध्यम ) शाळेस तात्पुरती मान्यता देत आहे.

**वरील मान्यता ही खालील शर्तीच्या पूर्ततेच्या अधीन आहे:-**

1. मान्यतेचा कालावधी वाढवून मिळणार नाही आणि इयत्ता आठवीनंतर मान्यता किंवा संलग्नता देण्यास कोणत्याही परिस्थितीत कोणतेही बंधन नसेल.

2.बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाचा अधिनियम, 2009(जोडपत्र एक) आणि महाराष्ट्र बालकांना मोफत व सक्तीच्या शिक्षणाच्या हक्क नियम, 2011 (जोडपत्र दोन) मधील तरतुदींचे शाळा पालन करील.

3.शाळा नजीकच्या दुर्बल घटकातील आणि वंचित गटातील बालकांना,पहिल्या इयत्तेत, त्या इयत्तेतील विद्यार्थी संख्येच्या किमान 25% मर्यादेपर्यंत प्रवेश देईल आणि प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत त्यांना मोफत व सक्तीचे शिक्षण देईल परंतु आणखी असे की, पूर्व प्राथमिक इयत्तांच्या बाबतीतदेखील या प्रमाणकाचे अनुपालन करण्यात येईल.

4.परिच्छेद 3 मध्ये निर्दिष्ट केलेल्या बालकांकरिता शाळेला अधिनियमाच्या कलम 12(2) नुसार प्रतिपूर्ती मिळेल, अशी प्रतिपूर्ती मिळण्यासाठी शाळेला स्वतंत्र बॅंक खाते देण्यात येईल.

5. संस्था/शाळा कोणतीही कॅपिटेशन फी वसूल करणार नाही आणि कोणत्याही छाननी पध्दतीसाठी बालकास किंवा त्याच्या किंवा तिच्या मात्या-पित्यास किंवा पालकास भाग पाडणार नाही.

6 .कोणत्याही बालकास वयाच्या पुराव्याच्या अभावी; धर्म,जात किंवा वंश,जन्मठिकाण किंवा यापैकी कोणत्याही कारणास्तव,शाळेमध्ये प्रवेश नाकारता येणार नाही.

7 (एक) शाळेत प्रवेश दिलेल्या कोणत्याही बालकास तो ज्या इयत्तेत असेल त्याच इयत्तेत रोखून ठेवले जाणार नाही किंवा प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत शाळेतून काढून टाकण्यात येणार नाही.

(दोन)कोणत्याही बालकास शारीरिक शिक्षा किंवा मानसिक त्रास देण्यात येणार नाही.

(तीन)कोणत्याही बालकास प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत कोणत्याही मंडळाची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असणार नाही.

(चार)प्राथमिक शिक्षण पूर्ण केलेल्या प्रत्येक बालकास, नियम 23 अन्वये निर्धारित केलेले प्रमाणपत्र देणेत येईल.

(पाच)विकलांग / विशेष गरजा असलेल्या विद्यार्थ्यांच्या अधिनियमाच्या तरतुदीनुसार समावेश करणेत येईल.

(सहा) अधिनियमाच्या कलम 23(1) अन्वये निर्धारित केलेली किमान अर्हता धारण करणाऱ्या शिक्षकांची नियुक्ती करण्यात येईल. परंतु आणखी असे की, अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकास किमान अर्हता धारण न करणाऱ्या शिक्षकांना अशी किमान अर्हता 5 वर्षाच्या कालावधीत संपादित करावी लागेल.

(सात) अधिनियमाच्या कलम 24(1) मध्ये विनिर्दिष्ट केलेली त्याची/ तिची कर्तव्ये शिक्षक पार पाडतील, आणि

(आठ) शिक्षकाने / शिक्षिकेने खाजगी शिकवणीच्या कामात स्वत:ला गुंतवून घेऊ नये, याची सुनिश्चिती शाळा करील.

8. शाळा समुचित प्राधिकरणाने निर्धारित केलेल्या अभ्यासक्रमाच्या आधारे तयार केलेल्या पाठ्यक्रमाचे पालन करील.

9. शाळा, अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विहित केल्याप्रमाणे शाळेत उपलब्ध असलेल्या सुविधांच्या तुलनेत विद्यार्थ्यांना प्रवेश देईल.

10.शाळा अधिनियमाच्या कलम 19 मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या मानकांचे व प्रमाणकांचे पालन करील. मागील तपासणीच्या वेळेत शाळेत उपलब्धअसलेल्या सुविधा खालीलप्रमाणे होत्या:-

- शाळेच्या परिसराचे क्षेत्रफळ : 4000 चौ.मी स्के.फुट
- एकूण बांधकाम क्षेत्र: 1400 चौ.मी स्के.फुट
- खेळाच्या मैदानाचे क्षेत्रफळ.:- 2600 चौ.मी स्के.फुट

- वर्ग खोल्यांची संख्या. :- 17 वर्ग खोल्या
- कार्यालय-नि-भांडार-नि-मुख्याध्यापकाची खोली. :- 4 वर्ग खोल्या
- मुलांसाठी व मुलींसाठी स्वतंत्र प्रसाधन गृहे- जेथे वापरण्यासाठी व प्रसाधनगृहे स्वच्छ आणि आरोग्यदायी स्थितीत ठेवण्यासाठी पुरेसे पाणी असेल :-

| | मुले | मुली |
|---|---|---|
| संडास़ - | 4 | 4 |
| मुताऱ्या- | 26 | 12 |

- पिण्याच्या पाण्याची सुविधा : आहे
- दुपारचे जेवण शिजविण्यासाठी स्वयंपाकघर : लागु नाही
- अध्यापन अध्ययन साहित्य/खेळ व क्रीडाविषयक सामग्री/ग्रंथालय यांची उपलब्धता: आहे
- वाचन साहित्य विनासायास उपलब्ध: ( ग्रंथालय पुस्तक संख्या-2400, नियतकालिका/वर्तमानपत्र संख्या3)

11.मान्यता नसलेले वर्ग किंवा तुकड्या, शाळेच्या नावाने शाळेच्या परिसरात किंवा इतरत्र, चालविता येणार नाहीत.

12.शाळेची इमारत किंवा इतर बांधकाम किंवा क्रीडांगण हे केवळ शिक्षणाच्या व कौशल्य विकासाच्या प्रयोजनार्थ वापरण्यात येतील.

13.शाळा, सोसायटी नोंदणी अधिनियम, 1860(1860 चा 21) किंवा मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम,1950 अन्वये नोंदणी झालेल्या संस्थेमार्फत चालविण्यात येत आहे.

14.शाळा कोणत्याही व्यक्तीच्या, गटाच्या किंवा व्यक्तीसंघाच्या किंवा इतर कोणत्याही व्यक्तीच्या फायद्याकरिता किंवा कोणताही नफा मिळविण्यासाठी चालविण्यात येत नाही.

15.शाळेचे लेखे सनदी लेखापालाकडून लेखापरिक्षित व प्रमाणित करुन घ्यावेत आणि नियमांनुसार योग्य लेखा विवरणपत्रे तयार करावीत. प्रत्येक लेखा विवरणपत्राची एक प्रत दरवर्षी जिल्हा शिक्षणाधिकाऱ्यांकडे पाठवण्यात यावी.

16.तुमच्या शाळेला मिळालेल्या मान्यता संकेतांक **एसएफएस-1021/प्र.क्र.460/एसएम-2,दिनांक** 13/04/2022 असा आहे. हा या कार्यालयाशी कोणताही पत्रव्यवहार करताना तो नमूद करावा, याची नोंद घ्यावी.

17. शिक्षण संचालक/जिल्हा शिक्षणाधिकारी वेळोवेळी मागणी करतील असे अहवाल व माहिती शाळेने सादर करावी किंवा शाळेच्या मान्यतेच्या शर्तीची निरंतर पूर्तता करण्यासाठी किंवा शाळेच्या कामकाजातील त्रुटी दूर करण्यासाठी शासन किंवा स्थानिक प्राधिकरण देईल अशा सूचनांचे पालन करावे.

18.संस्थेच्या नोंदणीचे कोणतेही असल्यास नूतनीकरण केल्याची सुनिश्चिती करावी.

19.जोडपत्र "तीन" नुसार इतर शर्ती यासोबत जोडल्या आहेत.

(संध्या गायकवाड)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
पुणे जिल्हा परिषद, पुणे